MHYA100002352026

<u>कि. दि. अर्ज क्र. ९/२०२६ **निशाणी क्रं.१ वरील आदेश**</u>
**<u>सविता व इतर वि. कोणीही नाही.</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मयत सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारांचा अर्ज असा आहे की, अर्जदार क्र. १ चे पती अर्जदार क्र २ ते ५ यांचे वडील स्व. सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार हे मुळचे मौजा पाटणबोरी, ता. केळापूर, जि. यवतमाळ येथील रहिवासी असून ते दिनांक १०/०१/२०२६ रोजी पाटणबोरी येथे घरी येथे मृत्यू पावले आहेत. मयत सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार यांचे पश्चात अर्जदार क्र.१ ते ५ हेच त्यांचे मृत्युनंतर कायदेशीर वारस असुन त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत.

**३.** अर्जदारांना मृतक सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार यांच्या मृत्यूपश्चात इतर शासकिय व निमशासकिय कार्यालयीन कामाकरीता तसेच कार व मोटारसायकल अर्जदाराचे नावे करण्याकरिता वारसान प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने ते संबंधीत कार्यालयाकडे गेले असता त्यांनी विद्यमान कोर्टातून वारसान प्रमाणपत्र घेण्यास तोंडी समज दिली. त्यामुळे अर्जदारांना मयत सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार यांचे वारस असल्याबाबत वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळावा म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.06.22 16:29:07 +0530

**४.** प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने दिनांक

१९/०२/२०२६ रोजी 'दैनिक लोकदूत' या वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रकाशित करण्यात आली होती. तसेच एक प्रत, जिल्हाधिकारी कार्यालय, पांढरकवडा, नगरपंचायत कार्यालय, पांढरकवडा, ता. केळापूर, मा. सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, केळापूर यांचे सुचना फलकावर जाहीरनामा प्रकाशित करुन तसेच मयताच्या घरावर जाहिरनाम्याची प्रत लावली याबाबत कोणाची हरकत असल्यास मागविण्यात आली होती. जाहीरनामा व जाहीर सूचना प्रकाशित केल्यानंतर कोणीही व्यक्तीने या अर्जाला न्यायालयात हजर राहुन आक्षेप घेतला नाही.

**५.** आपले म्हणणे सिध्द करण्यासाठी अर्जदारांनी अर्जदार क्र. ३ सचिन सुरेश गंगशेट्टीवार यांना (नि.क्र.१२) प्रमाणे तपासलेले आहे. परंतू सदर साक्षीदाराची उलट तपासणी न झाल्यामुळे त्यांची साक्ष ही कायम राहिली. आपल्या कथनाच्या समर्थनार्थ त्यांनी मृतक सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार यांची मृत्युप्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत अनुक्रमे (नि.क्र.१५), मृतक यांच्या नावे असलेली वाहन क्र. एम एच २९ बीपी ९४१६ तसेच वाहन क्र. एम एच २९ बीएल ४१५० चे वाहन नोंदणी प्रमाणपत्राची पडताळणी केलेल्या प्रती अनुक्रमे (नि.क्र.१६ व १७), अर्जदार क्र. १,२,४ व ५ यांच्या आधारकार्डच्या पडताळणी केलेली प्रती अनुक्रमे (नि.क्र.१८ ते २२), प्रशासक ग्रामपंचायत पाटणबोरी यांनी जारी केलेले वारसाचे प्रमाणपत्र (नि.क्र. २३) व दैनिक 'लोकदूत' मधील जाहीर नोटीस (नि.क्र. २४) प्रमाणे या कागदपत्रांवर भिस्त ठेवली आहे. तसेच (नि.क्र.२५) वरील पुरसीस प्रमाणे आपला पुरावा बंद केलेला आहे. अर्जदारांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जास आजपावेतो कोणीही हरकत घेतलेली नाही.

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.06.22 16:29:13 +0530

**६.** संपूर्ण अभिलेखाचे तसेच कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदारांच्या

मागणीला विरोध दर्शविणारा कोणताही पुरावा या अर्जात नाही. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी केवळ वारस दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज सादर केलेला असल्याने अर्जदार क्र.१ ते ५ हेच मयताचे वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहे. सदर वारस प्रमाणपत्राद्वारे अर्जदारांना मयताचे नावे असलेल्या चल अचल मिळकती संबंधात कोणतेही अधिकार प्रदान करण्यात येत नाहीत. त्यामुळे वरील सर्व विवेचनावरुन मी या निष्कर्षाला पोहचलो की, स्व. सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार यांचे अर्जदार क्र.१ ते ५ हेच कायदेशीर वारस आहे व अर्जदाराचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश पारीत करत आहे.

// **आदेश** //

१. अर्जदारांचा सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. याद्वारे असे प्रमाणीत करण्यात येते की, अर्जदार क्र. (१) श्रीमती सविता सुरेश गंगशेट्टीवार, वय ७० वर्षे, धंदा– गृहिणी, रा. पाटणबोरी, ता. केळापूर, जि. यवतमाळ (२) सौ. राणी राजकुमार रेवनवार, वय ४७ वर्षे, धंदा– गृहिणी, रा. देवी वार्ड, देवकृपा चौक, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ. (३) सचिन सुरेश गंगशेट्टीवार, वय ४७ वर्षे, धंदा – व्यवसाय, रा. पाटणबोरी, ता. केळापूर, जि. यवतमाळ (४) सौ. सपना निश्चल पत्तीवार, वय ४४ वर्षे, धंदा – गृहिणी, रा. रविंद्र नगर, अदिलाबाद, ता. जि. अदिलाबाद (५) सौ. अमृता मनोज व्यवहारे, वय ४२ वर्षे, धंदा–गृहिणी, रा.– महात्मा गांधी वार्ड, उमरखेड, ता. उमरखेड, जि. यवतमाळ हे स्व. सुरेश राजेश्वर गंगशेट्टीवार यांचे वारस आहेत.

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.06.22 16:29:20 +0530

३. अर्जदारांनी वारस दाखला मिळणेसाठी योग्य तो न्यायालयीन शुल्क भरावा.

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI

Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.06.22 16:29:28 +0530

दिनांक – २२/०६/२०२६. (एफ के. सिद्दीकी)

ठिकाण – केळापूर दिवाणी न्यायाधीश क. स्तर.,

**केळापूर**

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Ku. V. R. Gulhane |
| Court Name | : | Court of Jt. CJJD., Kelapur |
| Date | : | 22/06/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 22/06/2026 |
| Judgment uploaded on | : | 22/06/2026 |

**XXXX**